


दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

**1,22,570**
डिजिटल प्रतींचे दररोज
सोशल मीडियाच्या
माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील
लोकप्रिय दैनिक



● वर्ष : ०२ ● अंक : १८४ ● पुणे ● बुधवार, दि. ०४ जून २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313

# विराटच किंग



## RCBने १८ वर्षांनंतर IPL ट्रॉफीवर नाव कोरले, कोहलीच्या 'विराट' स्वप्नपूर्तीने चाहते भावूक



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

18 वर्षे... एक दीर्घ प्रतीक्षा, असंख्य अपेक्षा आणि लाखो चाहत्यांचा अटळ विश्वास. रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू (RCB) ने अखेर 3 जून रोजी अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर आयपीएल 2025 ची ट्रॉफी उंचावली. पंजाब किंग्जविरुद्धच्या अंतिम सामन्यात 00 धावांनी रोमांचक विजय मिळवून RCB ने 18 वर्षांच्या संघर्षाला पूर्णविराम दिला. हा विजय केवळ एक जेतेपद नाही, तर भावनांचा महासागर आहे, ज्याने प्रत्येक RCB चाहत्याच्या डोळ्यांत आनंदाश्रू आणले.

नरेंद्र मोदी स्टेडियमवर झालेल्या सामन्यात आरसीबीने प्रथम खेळताना 9 विकेट्सच्या मोबदल्यात 190 धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल, पंजाब किंग्जचा संघ संपूर्ण षटके खेळूनही केवळ 7 बाद 184 धावा करू शकला. लीग इतिहासातील हे आरसीबीचे पहिले विजेतेपद आहे.

2008 मध्ये आयपीएलच्या पहिल्या हंगामापासून RCB चा प्रवास सुरू झाला. विराट कोहली, राहुल द्रविड, एबी डिव्हिलियर्स, ख्रिस गेल यांसारख्या दिग्गजांनी या संघाला आपले रक्त-घाम दिले, पण ट्रॉफीने नेहमीच हुलकावणी दिली. 2009, 2011 आणि 2016 मध्ये अंतिम फेरीत पोहोचूनही RCB ला पराभवाचा सामना करावा लागला. प्रत्येक हंगामात चाहत्यांनी जेतेपद जिंकू असा विश्वास व्यक्त केला, पण प्रत्येकवेळी निराशा पदरी पडली. तरीही, RCB च्या चाहत्यांचा विश्वास कधी डगमगला नाही. बेंगळुरुच्या रस्त्यांपासून ते सोशल मीडियापर्यंत, #PlayBold हा नारा चाहत्यांच्या हृदयात कायम जिवंत राहिला.

RCB चा हा विजय केवळ एक जेतेपद नाही, तर एका नव्या युगाची सुरुवात आहे. यंदाच्या हंगामात RCB ने दाखवलेली आक्रमकता, संतुलन आणि आत्मविश्वास यामुळे हा संघ आगामी हंगामातही यशस्वी होऊ शकतो. चाहत्यांच्या विश्वासाला आणि खेळाडूंच्या मेहनतीला मिळालेली ही ट्रॉफी RCB च्या इतिहासातील सुवर्णपान आहे.

अंतिम सामन्यात पंजाब किंग्ज संघ 191 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी मैदानात उतरला तेव्हा त्यांच्या सलामी जोडीने पहिल्या विकेटसाठी 43 धावांची भागीदारी केली. त्यानंतर त्यांना पहिला धक्का प्रियांश आर्यच्या रूपात बसला तो 24 धावा काढून बाद झाला. त्याच वेळी, प्रभसिमरन सिंग आणि जोश इंग्लिश यांच्या जोडीने डावाची सूत्रे हाती घेतली आणि धावसंख्या 72 धावांवर नेली. कृणाल पंड्याने प्रभसिमरनला पॅव्हेलियनमध्ये पाठवले, ज्यामुळे आरसीबी संघाने सामन्यात पुनरागमन केले आणि येथून त्यांनी पंजाब किंग्जला कोणत्याही प्रकारे सामन्यात परतण्याची संधी दिली नाही. या सामन्यात मोठी खेळी खेळण्याची अपेक्षा असलेल्या श्रेयस अय्यरला फक्त एक धाव करता आली.

कृणाल पंड्याने अंतिम सामन्यात 2 बळी घेतले तर त्याच्या 4 षटकांमध्ये फक्त 17 धावा दिल्या, ज्यामुळे या अंतिम सामन्यात सर्वात मोठा फरक पडला. कृणाल व्यतिरिक्त, भुवनेश्वर कुमारनेही आरसीबीसाठी 2 विकेट्स घेतल्या RCB चे जेतेपद हे प्रत्येक चाहत्याला समर्पित आहे, ज्याने प्रत्येक हंगामात संघाला साथ दिली. प्रत्येक पराभवानंतरही हसत हसत 'पुढच्या वेळी नक्की!' म्हणत विश्वास कायम ठेवला. RCB ची ही स्वप्नपूर्ती म्हणजे क्रिकेटच्या या उत्सवाचा खरा जल्लोष आहे. 'ई साला कप नमदू' हे स्वप्न अखेर सत्यात उतरले!

## अन् महिलेचा घटस्फोट टळला

पंजाब किंग्ज आणि रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू (आरसीबी) यांच्यात (दि.४) होणाऱ्या अंतिम सामन्याकडे क्रिकेटप्रेमींचे लक्ष्य लागले होते. अखेर 'आरसीबी'ने बाजी मारत 'आयपीएल 2025' च्या ट्रॉफीवर आपले नाव कोरले. यादरम्यान एका महिलेचा व्हिडिओ प्रचंड व्हायरल होत आहे. आरसीबीने टॉफी जिंकली अन् महिलेचा घटस्फोट टळला, अशा अशयाच्या पोस्ट सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. आरसीबीने आयपीएलचा अंतिम सामना जिंकला नाही, तर मी माझ्या पतीला घटस्फोट देईन, असा मजकूर लिहलेला बँनर महिलेने झळकवला होता. या महिलेने काय विचार करून एवढा मोठा धोका पत्करला, असा प्रश्न क्रिकेटप्रेमींना पडला होता. अखेर अंतिम सामन्यावर आरसीबीने मोहर उमटवली आणि त्या महिलेचा घटस्फोट टळला. रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूने गुरूवारी धमाकेदार कामगिरी करत आयपीएलच्या अंतिम सामन्यात प्रवेश केला होता. हा सामना चंदीगडमधील मुल्लनपूर येथे झाला होता. या सामन्यादरम्यान लाल साडी परिधान केलेल्या महिलेने सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते. जर 'आरसीबी'ने अंतिम सामन्यात विजय मिळवला नाही, तर मी माझ्या पतीला घटस्फोट देईन, असा मजकूर लिहलेला बँनर या महिलेने झळकवला होता. आपल्या आवडत्या टीमवर विश्वास ठेवून या महिला आपल्या संसारावर तुळसीपात्र ठेवते की काय? असा प्रश्न क्रिकेटप्रेमींना पडला होता. अखेर आरसीबीने हा अंतिम सामना आपल्या नावावर करत आयपीएलच्या टॉफीवर नाव कोरल्याने त्या महिलेचा घटस्फोट टळला असं म्हणणं गैर नाही.






## या कारणांमुळे आरसीबीने कप जिंकला

17 वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीनंतर अखेर रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरुने मंगळवारी आयपीएलच्या अंतिम सामन्यात पंजाब किंग्जवर सहा धावांनी विजय मिळवत चषकावर नाव कोरले. १७ वर्षांच्या जखमेवर विजयाचं मलम लावत आरसीबीने समर्थकांना सेलिब्रेशनची संधी दिलीच. या विजयाचं श्रेय कोणाचं, ख्रिस गेल, ए बी डिव्हिलियर्स अशा दिग्गजांचा भरणा असतानाही जे शक्य झालं नाही ते 2025 मध्ये कसं शक्य झाले हे जाणून घेऊया....

गतवर्षी नोव्हेंबरमध्ये आयपीएलच्या लिलावापूर्वी आरसीबीचे संचालक मो बोबाट यांनी केलेलं विधान संघाचा दृष्टीकोन अधोरेखित करते. ते म्हणाले होते, आम्ही खेळाडू कसा खेळतो यापेक्षा तो संघासाठी कसा खेळू शकतो याला प्राधान्य देतोय. खेळाडूची प्रतिष्ठा आणि नाव या पेक्षा संघाची कामगिरी महत्त्वाची असे स्पष्ट संदेश त्यांनी संघाला दिला.

16 सामन्यांमध्ये नऊ खेळाडूंना सामनावीर हा पुरस्कार मिळाला. यातच आरसीबीचा संघ हा सर्वोत्तम का ठरला हे स्पष्ट होते. क्रुणाल पंड्या, टीम डॅव्हीड, जोश हॅजलवूड, फिल सॉल्ट, जितेश शर्मा, सुयश शर्मा ही यादी वाचली की नवीन खेळाडूही चमत्कार घडवू शकतात हे सिद्ध होते.

आरसीबीच्या संचालकांनी त्यांचा हेतू काय हे स्पष्ट केल्यानंतर पुढची जबाबदारी होती ती हेड कोच अँडी फ्लोवर, बँटिंग मेंटॉर दिनेश कार्तिक यांची. झिम्बाब्वेच्या अँडी फ्लॉवरने भारताविरुद्ध धावांचा पाऊस पाडत भारतीयांच्या डोळ्यात पाणी आणलं होतं. पण हाच अँडी फ्लॉवरमुळे आरसीबी समर्थकांच्या डोळ्यात आनंदाश्रू आणण्यासाठी कारणीभूत ठरला. उदाहरण द्यायचं झालं तर यंदा संघाचा कर्णधार होता रजत पाटीदार. रजत पाटीदार हा आंतरराष्ट्रीय स्तरावर नावाजलेला क्रिकेटपटू नसला तरी सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीत त्याने मध्य प्रदेशला अंतिम सामन्यापर्यंत नेले. इतकंच नव्हे तर तो मालिकेत सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत दुसऱ्या क्रमांकावर होता. फ्लॉवर आणि कार्तिकने मध्य प्रदेशचे प्रशिक्षक चंद्रकांत पंडित यांच्याशीही चर्चा केली आणि शेवटी कर्णधारपदी रजतच्या नावावर शिक्कामोर्तब झाले.निर्णय घेण्याची क्षमता आणि नेतृत्वगूण या दोन कारणांसाठी रजत पाटीदारला संघाचे कर्णधारपद देण्यात आले. निर्णय घेण्यापूर्वी फ्लॉवर आणि कार्तिकने विराट कोहलीला विश्वासात घेतले. कोहलीनेही रजत पाटीदारला पाठिंबा दर्शवला.

फिल सॉल्टला तर आरसीबीने तब्बल 11. 25 कोटी रुपयांमध्ये संघात घेतलं. सॉल्टमध्ये चांगलं षटक हे मोठ्या षटकात बदलण्याची क्षमता आहे असं दिनेश कार्तिकने एका मुलाखतीत सांगितलं होतं.

## कोहली बनला 'चौकार सम्राट', धवनचा विक्रम मोडला

आयपीएल 2025 च्या हंगामातील अंतिम सामना रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू आणि पंजाब किंग्ज यांच्यात अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळला जात आहे, या सामन्यात आरसीबीने प्रथम फलंदाजी केली. अंतिम सामन्यात मोठी खेळी खेळण्याची अपेक्षा असलेला विराट कोहली 35 चेंडूत 43 धावा काढल्यानंतर बाद झाला. या खेळीच्या जोरावर त्याने आयपीएलच्या इतिहासात एक मोठा विक्रम नोंदवला. यात त्याने शिखर धवनला मागे टाकले.विराट कोहली आता आयपीएलच्या इतिहासात सर्वाधिक चौकार मारण्याच्या बाबतीत पहिल्या क्रमांकावर पोहोचला आहे. पंजाब किंग्जविरुद्धच्या अंतिम सामन्यात कोहलीने 43 धावांच्या खेळीदरम्यान एकूण तीन चौकार मारले. यासह, आयपीएलच्या इतिहासात कोहलीच्या नावावर आता एकूण 771 चौकारांची नोंद झाली आहे. कोहलीपूर्वी, नंबर-1 स्थानावर असलेल्या शिखर धवनने आयपीएलच्या इतिहासात एकूण 768 चौकार मारण्याचा विक्रम केला होता.

# लाडकी बहीण योजनेतील गैरफायदा चिंताजनक



राज्य सरकार जनतेच्या भल्यासाठी अनेक योजना आणते. तळागाळातील लोकांना त्यांचा फायदा व्हावा हा त्यामागील हेतू असतो. पण, योजनेच्या माध्यमातून लाभार्थ्यांना जे पैसे मिळतात, ते जनतेकडून कररूपाने आलेल्या पैशांचा तो एक भाग असतो, हे कटूसत्य आहे. पण, हाच पैसा चुकीच्या लाभार्थ्यांच्या हाती पडला असे जेव्हा सरकारी करदात्यांना कळते, तेव्हा त्यांना नक्कीच दु:ख होत असेल. महाराष्ट्र सरकारने विधानसभा निवडणुकीच्या आधी लाडकी बहीण योजना ही महत्त्वाकांक्षी योजना आणलेली होती. ही योजना इतकी लोकप्रिय होती की, पुन्हा महायुतीचे सरकार सत्तेवर येण्यास योजना फायदेशीर ठरली असे राजकीय जाणकारांचे म्हणणे आहे. आता मात्र, या योजनेतील अपात्र संख्येवरून नव्या चर्चेला सुरुवात झाली आहे. ११ लाख महिलांना या योजनेतून अपात्र ठरविण्यात आले आहे.

येत्या काही दिवसांत छाननीमध्ये ५० लाख महिला अपात्र ठरू शकतात, असा अंदाज बांधला जात आहे. एखाद्या सरकारी योजनेतून अपात्र होण्यासाठी एवढा मोठा लाखोंचा आकडा असू शकतो, ही योजना राबविणाऱ्या प्रशासनाची एक प्रकारे नामुष्की म्हणायला हरकत नाही; परंतु एखादी गोष्ट फुकट मिळत असेल, तर नैतिकता, समाजातील प्रतिष्ठा यांचा विचार न करता, सरकारी योजनेतील पैसे लाटण्याची प्रवृत्ती बरे नव्हे. ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न हे अडीच लाखांपेक्षा कमी आहे, अशा कुटुंबातील महिलांसाठी राज्य सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरू केली होती. महायुती सरकारने लाडकी बहीण योजना १ जुलै २०२४ पासून अमलात आणली. योजनेचा मुख्य उद्देश महिलांना आर्थिक स्वातंत्र्य, आरोग्य आणि पोषण सुधारणा तसेच कुटुंबातील निर्णायक भूमिका मजबूत करणे ही होती. त्यासाठी २ कोटी ६३ लाख महिलांनी अर्ज केले होते. त्यापैकी २ कोटी ४१ लाख महिला पात्र ठरल्या होत्या. या पात्र ठरलेल्या महिलांना प्रत्येक महिन्याला दीड हजार रुपये मिळाले होते. जून महिना सुरू झाला तरी अजूनही लाभार्थी महिलांच्या खात्यामध्ये



मे महिन्याचे पैसे जमा झालेले नाहीत. त्यामुळे मे महिन्याचा हप्ता बँक खात्यामध्ये कधी जमा होणार? याकडे आता लाडक्या बहिणींचे लक्ष लागले आहे.

१० जूनला वटपौर्णिमा आहे. वटपौर्णिमा हा सण महिलांसाठी महत्त्वाचा असतो. त्यामुळे वटपौर्णिमेच्या मुहूर्तावर लाडक्या बहिणींच्या बँक खात्यामध्ये मे महिन्याचे दीड हजार आणि जून महिन्याचे दीड हजार असे तीन हजार रुपये जमा केले जाऊ शकतात, अशी चर्चा आता सुरू झाली आहे. दुसऱ्या बाजूला राज्यभरातील लाखो महिलांनी या योजनेत अर्ज केले होते. त्या अर्जांची पडताळणी मोठ्या प्रमाणात सुरू आहे. यात अनेक महिला अपात्र असतानाही त्यांनी या योजनेचा लाभ घेतला ही बाब समोर आली होती. त्यामुळे अशा महिलांचे अर्ज बाद करण्यात येत आहेत. आतापर्यंत अडीच हजारांहून अधिक सरकारी कर्मचाऱ्यांनी गैरफायदा घेतल्याचे उघड झाले, ही धक्कादायक बाब आहे.

सरकारी कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ घेता येणार नाही असे शासन निर्णयातच स्पष्ट करण्यात आले होते. तरीही महिला कर्मचाऱ्यांनी अर्ज भरले तसेच योजनेचा लाभही घेतला. यात वर्ग तीन आणि वर्ग चारच्या महिला कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. तक्रारीनंतर आणखी सहा लाख कर्मचाऱ्यांची अशाच पद्धतीने तपासणी केली जाणार आहे. शिपाई पदावर काम करणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्यांचे वार्षिक उत्पन्न हे चार लाख रुपयांच्या वर असते. असे असताना, अडीच लाखांपेक्षा कमी उत्पन्न असलेला महिला या योजनेचा लाभ घेऊ शकते अशी अट असतानाही, अर्ज करण्याचे धाडस कसे केले या सरकारी महिलांनी? ज्या सरकारच्या पैशांवर रोजीरोटी चालते त्या सरकारशी अप्रामाणिक वागण्याचे काम संबंधित सरकारी महिलांनी केले आहे.

उंच टॉवर्समध्ये राहणाऱ्या तसेच चारचाकी वाहन मालकीच्या असलेल्या महिलांनी गरीब महिला बनवून सरकारला फसविले आहे, हे सामाजिकदृष्ट्या अत्यंत क्लेशदायक आहे. तसेच, सुमारे ९ लाख महिलांनी नमो शेतकरी योजना आणि लाडकी बहीण या दोन्ही योजनांचा आर्थिक लाभ घेतल्याचे तपासात आढळून आले. त्यांनी लाडकी बहीण योजनेचे दीड हजार रुपये महिन्याकाठी घेतले आहेत. त्याचवेळी केंद्र व राज्य सरकारकडून नमो शेतकरी योजनेत प्रत्येकी बारा हजार रुपये घेतले. याचा अर्थ वर्षाकाठी त्यांना ३० हजार रुपये मिळाले आहेत. लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून ज्यांना सरकार तिजोरीतून यापूर्वी दिलेले पैसे परत घेणार नसल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जाहीर केल्याने, आतापर्यंत जो पैसा लुटला गेला त्यावर आता पडदा पडला आहे. यापुढे नवीन हप्ते केवळ पात्र महिलांनाच मिळतील, असे सरकारने स्पष्ट केल्याने, येत्या काही दिवसांत गरजू, गरीब बहिणींचा निश्चित आकडा किती हे समोर येईलच. मात्र, सरकारने अन्य योजना राबविताना, लाभार्थ्यांची संपूर्ण पडताळणी केल्याशिवाय त्यांच्या खात्यावर पैसे वळते करू नये, ही सुद्धा सर्वसामान्य करदात्यांची भावना आहे. या योजनेतून अपात्र लाभार्थ्यांचा लाखो संख्येचा आकडा हा चिंताजनक असला तरी, दुसरी योजना राबविताना प्रशासनाने खबरदारी घ्यावी, एवढी माफक अपेक्षा करायला हरकत नाही.

# नवीन मुलांची ॲडमिशन घेताय? जरा जपून !

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

प्रत्येकाला आपल्या मुलाने चांगल्या शाळेत जावे असे वाटते. मात्र या शाळेत घालतो त्या शाळेची पार्श्वभूमी किंवा इतर काही गोष्टीविषयी पालकांना क्वचितच माहिती असते. नुसत्या आकर्षक जाहिराती बघून मुलांना शाळेमध्ये टाकताना विचार करण्याची गरज आहे. नऱ्हे भागातील सामाजिक कार्यकर्ते भूपेंद्र मोरे यांनी मागील काही वर्षापासून विनापरवानगी व अनाधिकृत शाळांविरोधात तीव्र मोहीम राबविली होती. नोंदणीकृत नसलेल्या अनधिकृत शाळेसाठी "शिक्षणाच्या आईचा घो" नावाने त्यांनी जोरदार अभियान राबविले .ज्यामध्ये विविध शाळांना भेटी देऊन त्यांचा वैधता तपासल्या.




ह्यामध्ये जवळपास ८ शाळावरती कारवाई करण्यात आली त्यामध्ये काही दंडात्मक कर काहीना शाळा बंद कराव्या लागल्या.

खुद्द तत्कालीन शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनीही मोरे यांनी केलेल्या कामाची दखल घेतली. अनेक अनाधिकृत शाळांना यासंबंधी नोटीसा पाठवण्यात आल्या.

सध्या सर्वत्र प्रवेशाचा काळ सुरू आहे.

केजी टू पीजी नवीन ॲडमिशन होत आहेत. अशावेळी पालकांनी आपल्या बालकांना शाळेत मध्ये घालताना अनेक गोष्टी तपासून घ्याव्या लागणार आहेत.

आज कालच्या अनेक शाळांची फीही भरमसाठ वाढते आहे. आरटीआय व्यतिरिक्त होणाऱ्या प्रवेशना ज्युनिअर केजी , प्रायमरी सर्वत्र फी आकारणी होत आहे.

आपल्या बालकांना चांगल्या प्रकारचे दर्जेदार शिक्षण मिळावे हीच भावना पालकांची आहे.मात्र शिक्षण संस्थांनी ही पालकांच्या अपेक्षा पूर्ण करून त्यांच्या पाल्याला एक आदर्श विद्यार्थी घडवण्याचं धोरण आखण्यात यावे तरच दर्जेदार शिक्षण मिळेल.

सध्या सर्व शाळांकडून मार्केटिंग जोरात केली जात असल्यामुळे पालकामध्येही बराच संभ्रम निर्माण होत आहे. त्यामुळे प्रत्यक्ष ॲडमिशन साठी जाताना आपण स्वतः विविध चौकशी करूनच ॲडमिशन घ्यावे लागेल.

एकंदरीत सध्याचा स्पर्धात्मक नर्सरी स्कूलचा माहोल पाहता ताक ही फुकून प्यावे लागेल. पालकांनी विचारपूर्वक निर्णय घेण्याची ही योग्य वेळ आहे.

## पालकांनी जपून विचार करून निर्णय घ्यावा

**ॲडमिशन घेण्यापूर्वी त्या शाळेचे इरादा पत्र, यु डी आय एस सर्टिफिकेट तपासणे गरजेचे आहे.आणि हे शाळेला मेन गेटवर लावणे बंधनकारक आहे. जर नसेल तर ती शाळा अनधिकृत आहे. आपल्या पाल्याची शिक्षकांची शैक्षणिक पात्रता तपासावी . त्यांची शिक्षणाहर्ता किमान बीएड किंवा डीएड झालेले असावे. सर्व बाबींचा विचार करूनच प्रवेश करण्यात यावा. अन्यथा आपल्या पाल्ल्याचे भवितव्य धोक्यात टाकू नये. शाळांच्या प्रवेशासंबंधी काही अडचण शंका आल्यास नक्कीच सहकार्य केले जाईल..**

**- भूपेंद्र मोरे, सामाजिक कार्यकर्ते**

# थोडक्यात



## कोंढवा गेट ते आळंदी बस सेवा सुरू करा : सुभाष नाणेकर यांची मागणी

**वारजे (आरंभ पर्व) : तीर्थक्षेत्र आळंदी येथील माऊलींचे दर्शनासाठी उत्तम नगर शिवणे व पंचक्रोशीतील वारकरी बांधव हे नित्यनेमाने जात असतात. मात्र त्यांच्या जाण्याची मोठी गैरसोय होते. ही बाब वारकरी बांधव व ग्रामस्थांनी माजी सरपंच सुभाष नाणेकर यांच्याकडे बोलून दाखवली. त्यानंतर कर्तव्यदक्ष नेतृत्व म्हणून ओळख असलेले माजी सरपंच सुभाषभाऊ नाणेकर यांनी पी एम पी एम एल च्या स्वारगेट कार्यालयात भेट दिली. पंचक्रोशीतील वारकरी बांधव व ग्रामस्थांच्या मागणीचा विचार करून कोंढवा गेट ते आळंदी बस सेवा चालू करण्याबाबत मागणी केली. पुणे शहर कार्यकारणी सदस्य भाजपा मा. सरपंच सुभाष नाणेकर यांनी पी एम पी एम एल मुख्य वाहतूक व्यवस्थापक सतीश गव्हाणे यांना निवेदन देऊन आग्रही मागणी केली. पंचक्रोशीतील उत्तम नगर शिवणे कोंडवे कोपरे,बहुली, सांगरून मांडवी,खडकवाडी कडजे,,खडकवासला, नांदेड ह्या भागातील वारकरी बांधव, नागरिकांना कोंडवा गेट ते आळंदी या बससेवेचा चांगला लाभ होणार आहे. त्यामुळे ही बस सेवा लवकरात लवकर सुरू करावी अशी मागणी यावेळी करण्यात आली. ह्यावर श्री गव्हाणे यांनी लवकरच निवेदनाचा विचार करून निर्णय घेऊ असे सांगितले. दरम्यान ही बस सेवा सुरू झाल्यास या भागातील नागरिकांना व भाविकांना मोठा लाभ होणार आहे.**



## अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त धायरीत स्वच्छता अभियान

**धायरी (आरंभ पर्व) : पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त धायरी व परिसरात स्वच्छता अभियान राबवण्यात आले. खडकवासला विधानसभा मंडल अध्यक्ष यशवंत लायगुडे यांच्या संयोजनातून अभियान राबवण्यात आले. धायरी गणेश नगर मसोबा परिसरातील रस्त्यावरील तसेच इतरत्र स्वच्छता मोहीम करण्यात आली. ह्या अभिनव उपक्रमाने अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी करण्यात आली. यावेळी माजी नगरसेवक राजाभाऊ लायगुडे, खडकवासला भाजपा मंडल अध्यक्ष यशवंत लायगुडे यांच्या सह कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.**

**राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचे जयंती ही सामाजिक उपक्रम राबवून करण्याचा मानस होता .यातून धायरी व परिसरातील स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. व नागरिकांना दिलासा दिला. यापुढे काळातील विविध उपक्रम राबविण्यात येतील.**

**- यशवंत लायगुडे, मंडल अध्यक्ष भाजपा**

## अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त निबंध स्पर्धेचे बक्षीस वितरण



**खडकवासला (दै. आरंभ पर्व) : भारतीय जनता पार्टी खडकवासला ग्रामीण च्या वतीने पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या 300 व्या जयंतीनिमित्त भव्य शालेय स्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये अडीचशे हुन अधिक विद्यार्थ्यांनी भाग घेतला. आज या स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला त्यामध्ये त्यामधून 1.नं... समृद्धी सचिन भालेकर इ. ८ वी डोणजे. 2 नं... दिक्षा रवि चव्हाण इ.८ वी. गोऱ्हे बुद्रुक. 3.नं.चैतन्य. संदीप. तागुंदे.इयत्ता सातवी. खडकवाडी या विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले. आयोजक तथा खडकवासला ग्रामीण अध्यक्ष नवनाथ तागुंदे , दिव्यांग विकास आघाडी पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष बाजीराव पारगे, दत्तात्रय तागुंदे, अक्षय तागुंदे किरण खिरीड बाळासाहेब पारगे, राजु भामे सुनिल मांढरे नंदुशेठ जावळकर ,नवनाथ मोकर यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते मान्यवरांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले.**

## शिवाजी भोसले यांचा सारोळे ग्रामपंचायतीतर्फे सत्कार



**बार्शी (दै. आरंभ पर्व)**

सारोळे तालुका बार्शी येथील सुपुत्र श्री. शिवाजी पांडुरंग भोसले यांना उत्तर सोलापूर तालुका आदर्श शिक्षक पुरस्कार नुकताच जाहीर करण्यात आला. त्यानिमित्त सारोळे ग्रामपंचायतच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. सन 2024, 2025 चा हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला आहे. ते 19 वर्षापासून अध्यापनाचे काम करत आहेत. सद्या प्राथमिक शाळेचे सहशिक्षक म्हणून कार्य करत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यस्तरीय शिष्यवृत्ती स्पर्धेमध्ये पंधरापैकी तेरा विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये यश मिळाले. शालेय श्री लंगडी स्पर्धेमध्ये राष्ट्रीय स्तरावर ट्रॉफी व जिल्हा राज्यस्तरावर लंगडी मध्ये प्रथम क्रमांक त्यांच्या शाळेने पटकावला. विज्ञान प्रदर्शनामध्येही विद्यार्थ्यांनी यश मिळवले आहेत. याशिवाय शिवाजी भोसले यांना सन 2014 साली सातारा तालुक्याचा आदर्श शिक्षक पुरस्कार व राज्यस्तरीय वर मार्गदर्शक शिक्षक म्हणून काम करण्याची संधी मिळाली आहे. गावच्या सुपुत्राचा सन्मान यावेळी ग्रामपंचायतीने केला. यावेळी माजी सरपंच बाळराजे गाटे, सरपंच सौ .सुवर्णा काकडे उपसरपंच जितुभाऊ चौधरी, सदस्या सौ .प्रेमला गाटे, नानासाहेब गाटे, राजाभाऊ गाटे, राजेंद्र गाटे ,ऑपरेटर गजानन बोधले, उत्तरेश्वर गोसावी, भारत जाधव, विजय महापुरे ,लक्ष्मण ठोंबरे यांच्यासह नागरिक उपस्थित होते. यावेळी बाळराजे गाटे यांनी भोसले यांच्या कार्याचे कौतुक केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## नांदेड सिटी येथे अहिल्यादेवी होळकर पुरस्कारांचे वितरण

### १५ कर्तृत्ववान महिलांचा आयोजकाकडून सन्मान



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दीनिमित्त निर्मला घुले प्रतिष्ठान व साहित्य संगीत कला सेवा अकॅडमीव भारतीय जनता पार्टी खडकवासला मंडल यांच्यावतीने अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले.

यावेळी विविध क्षेत्रांमध्ये काम करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात आला. कर्तुत्ववान महिलांना राजमाता अहिल्यादेवी होळकर पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले.

यावेळी खडकवासला विधानसभा मतदार संघाचे अध्यक्ष सचिन मोरे, खडकवासला मतदारसंघाचे सरचिटणीस बापूसाहेब पोकळे, मंडलाध्यक्ष रुपेश घुले पाटील, यावेळी पुणे शहर भाजपा अध्यक्ष सौ हर्षदाताई फरांदे ,

सोशल मीडिया संयोजकपरीक्षित देशपांडे , खडकवासला मतदारसंघाचे उपाध्यक्ष हेमेंद्र जोशी, वर्धमान भालेराव, उमेश सरपाटील सरपंच कोंडवे, भाजपा महिला आघाडीच्या पूर्वअध्यक्ष रश्मी घुले यांच्यासह विविध मान्यवर व महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

होळकर यांच्या जयंतीनिमित्त औचित्य साधून घेण्यात आलेल्या या कार्यक्रमात महिलांनीच पूर्ण कार्यक्रमाची धुरा सांभाळली.

यावेळी भाजपा महिला आघाडीचे सौ. रश्मी घुले पाटील यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाची माहिती दिली. महिलांसाठी राबवलेल्या विविध योजनांची व इतरही माहिती त्यांनी यावेळी दिली.

यावेळी महिलांसाठी सातत्याने याही पुढे विविध उपक्रम राबवण्याचा मानस यावी रश्मी घुले पाटील यांनी बोलून दाखवला.

तर हर्षदा फरांदे यांनी अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य हे सर्व महिलांना प्रेरणादायी आहे. असेच आगामी काळातील उपक्रम घेण्यात यावेत.ह्यासाठी आयोजकांचे आभार मानत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन अश्विनी कौसडीकर यांनी केले.

### यांचा झाला सन्मान

| | |
|---|---|
| १ ब्रह्मकुमारी ललिता दीदी | ८ सौ उषा सचिन दिघे |
| २ सौ फुलाबाई कदम | ९ सौ मेधा महेश भंडार कवठेकर |
| ३ ॲड सौ मुक्ता पुंडे | १० सौ ज्योत्स्ना पांढरे |
| ४ श्रीमती उज्वला देशपांडे पुराणिक | ११ प्रतीक्षा संदीप देवकाते |
| ५ श्रीमती सविता मांडे | १२ सौ .श्रद्धा नाडकर्णी |
| ६ उमा राय | १३ सौ वैशाली संजय कान्हेरकर |
| ७ सौ स्वाती आडगावकर | १४ सौ. संजीवनी सोपान बंदावणे |
| | १५ सौ सुप्रिया संग्राम करमरकर |

# पुन्हा शाळेत यायला आवडेल म्हणत २००३चा स्नेह मेळावा संपन्न !

**बार्शी (दै. आरंभ पर्व)**

शाळा म्हणले की आपल्या सर्वांचे आवडती! मात्र मला एकदा लहानाचे मोठे झाल्यानंतर आपल्या सर्वांना तिचा विसर नक्की पडतो. मात्र सारोळा येथील शरदचंद्रजी पवार प्रशाला शाळेच्या माजी विद्यार्थ्यांनी तब्बल २२ वर्षांनी एकत्र येत स्नेह मेळावा आयोजित केला. व पुन्हा तोच वर्ग आणि पुन्हा त्याच आठवणी जाग्या केल्या. सर्व विद्यार्थ्यांनी एकत्रित येऊन पुन्हा शाळेचा आनंद उत्साहित करूया या भावनेने या स्नेह मिळवायचे आयोजन करण्यात आले होते. त्यास उत्स्फूर्त असा प्रतिसाद सर्वांनी दिला..



शरद चंद्रजी पवार प्रशाला सारोळे 2003 2004 बॅच चा स्नेह मेळावा आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक धनाजी तिकटे प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे संचालक विलासदादा गाटे, प्रमुख उपस्थिती म्हणून सुनील खटाळ सर , बळीराम गुरव सर मोरे सर, अण्णासाहेब खोत सर, पुरुषोत्तम भड सर, दीपक गायकवाड सर प्रकाश ठोकळ सर, बाळासाहेब साळूंखे सर सुनील गोरे सर,विश्वनाथ साबळे सर व इतर शिक्षक उपस्थित होते. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांनी शाळेविषयी आपल्या भावना प्रकट करताना अनेक आठवणी जाग्या केल्या. शिक्षकांनी सूचना केलेल्या त्या पालन केले असत्यात तर निश्चितच फायदा झाला असता हे आज कळत आहे .ही खंत बोलून दाखवली. तर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षकांनीही जुन्या आठवणी जागा केल्या. गेले ते दिवस राहिल्या त्या आठवणी मात्र आपण सर्वांनी केलेल्या ह्या स्नेह मेळाव्याच्या कार्यक्रमातून पुन्हा एकत्रित आल्यामुळे आनंद नक्कीच वाटल्याचे शिक्षकांनी सांगितले.

व पुढील वाटचालीसाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी शाळेच्या माजी विद्यार्थ्यांनी शाळेला एक आठवण म्हणून 300 वह्यांचे वाटप करण्यात आले. तब्बल पाच तासांनी हा कार्यक्रम समाप्त झाला. रुचकर स्वादिष्ट भोजनाच्या साथीत हा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

स्नेहा मेळाव्याचे सूत्रसंचालन श्री दीपक मोरे यांनी केले.

तर कार्यक्रमासाठी सुरज चौधरी उदय कोढारे ,शशिकांत गाटे, समाधान भोसले ,भरत साबळे यांनी परिश्रम घेतले. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांनी शाळेविषयी आपल्या भावना प्रकट करताना अनेक आठवणी जाग्या केल्या. शिक्षकांनी सूचना केलेल्या त्या पालन केले असत्यात तर निश्चितच फायदा झाला असता हे आज कळत आहे .ही खंत बोलून दाखवली.

तर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षकांनीही जुन्या आठवणी जागा केल्या.

गेले ते दिवस राहिल्या त्या आठवणी मात्र आपण सर्वांनी केलेल्या ह्या स्नेह मेळाव्याच्या कार्यक्रमातून पुन्हा एकत्रित आल्यामुळे आनंद नक्कीच वाटल्याचे शिक्षकांनी सांगितले.

## थोडक्यात



### स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

नांदेड (आरंभ पर्व) : स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या १४२ व्या जयंतीनिमित्त निर्मला घुले प्रतिष्ठान व साहित्य संगीत कला समिती यांच्या वतीने विविध कार्यक्रम घेण्यात आले. नांदेड सिटी परिसर येथे हा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी संगीत सुरांची मैफिली घेण्यात आली. खडकवासला विधानसभा उपाध्यक्ष रुपेश घुले पाटील यांच्या नियोजनाखाली हा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी खडकवासला भारतीय जनता महिला मोर्चा आघाडीच्या रश्मीताई घुले पाटील, हेमेंद्र जोशी, गिरीशजी वसेकर, वर्धमान जी भालेराव ब्रह्मकुमारी सेंटरच्या ललिता, सामाजिक कार्यकर्ते प्रकाश गोरे महेश बजाज सुप्रिया क्रमांक संगीताताई शिंदे विजय कुमार शिंदे सतीश काळे रमेश प्रभू देसाई जितेंद्र धुमाळ अमृत दीक्षित डॉक्टर सुधीर बोरकर मनाली शहा गायक किरण गुरव गायक अर्चना कदम यांच्यासह नागरिक उपस्थित होते.



### धायरीतील पावसाळी लाईन दुरुस्ती सुरू; यशवंत लायगुडे यांचा पाठपुरावा

धायरी (आरंभ पर्व) : धायरी व परिसरामध्ये होणाऱ्या पावसामुळे जनजीवन विस्कळीत होत आहे. ह्याशिवाय ह्या भागात मोठी रहदारी व वाहतूक आहे. यामुळे वाहतूक कोंडीही होत असते. उंबऱ्या गणपती चौक येथील पोकळे डेअरी तसेच इतर भागात पावसाचे पाणी साचून नागरिकांना मनस्ताप होत होता. युवा नेते,भाजपा मंडलाध्यक्ष यशवंत लायगुडे यांनी ह्यासंबंधी अभियंता आणि निशिकांत छापेकर यांना प्रत्यक्ष स्थळावरून ही बाब निदर्शनास आणून दिली. व भागातील सर्वत्र पावसाळी लाईन व चेंबर यांची दुरुस्ती करून बदलण्यात यावी अशी मागणी यशवंत लायगुडे यांनी मनपा प्रशासनाकडे केली. अखेर महानगरपालिकेने या भागातील पावसाळ्याचे चेंबर बदलण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे पावसाळी यामध्ये साचणाऱ्या पाण्याचा निचरा होऊन नागरिकांचा प्रवास सुखकर होणार आहे. धायरीकरांनी या कामाबद्दल यशवंत लायगुडे व मनपा यांचे आभार व्यक्त केले.




### रस्त्यावरील राडाराडा उचलला; बाप्पूसाहेब पोकळे यांचा पाठपुरावा

धायरी (आरंभ पर्व) : बऱ्याच दिवसापासून खूप मोठ्या प्रमाणात पाऊस पडत आहे या पावसामध्ये धायरी गाव मधील धारेश्वर मंदिर परिसरामधील टॅमरिंड पार्क, पोकळे पाटील वस्ती या ठिकाणी जाणाऱ्या रोडवरती मोठ्या प्रमाणावर पावसाने वाहून आलेला राडा रोड वाळू माती खूप मोठ्या प्रमाणात साचले होते .त्यामुळे नागरिकांना येता जाता त्रास सहन करावा लागत होता. ही गोष्ट खडकवासला भाजपा सरचिटणीस बापूसाहेब पोकळे यांनी जाणून घेतली. व तात्काळ पुणे महानगरपालिकेशी संपर्क साधला. व तात्काळ उपाययोजना करण्यासाठी सूचित केले. त्यानंतर महानगरपालिकेच्या जेसीबी मशीन द्वारे व पोकळे यांनी स्वतःचा डंपर लावून हा राडा रोड उचलून घेण्यात आला.व नागरिकांचा मार्ग मोकळा करण्यात आला. परिसरातील नागरिकांनी याबद्दल समाधान व्यक्त केले.

# १७ वर्षानंतर विद्यार्थी आले एकत्र

## शरदचंद्रजी पवार प्रशालेचा २००८ दहावी बॅचचा स्नेहसंमेलन सोहळा उत्साहात

**बार्शी(दै. आरंभ पर्व)**

शेळगाव शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शरदचंद्रजी पवार प्रशाला सारोळे दहावी बॅच 2008चा स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. 17 वर्षानंतर एकत्र आलेल्या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत कथन करत 17 वर्षाच्या स्नेहभावाबद्दल आठवणी जाग्या केल्या.

सतरा वर्षानंतरच्या प्रदीर्घ खंडानंतर गुरुवर्य व विद्यार्थी गण

एकत्र पाहून सर्वजण भारवून गेले. मज आवडते मज मनापासून शाळा; म्हणत शाळेविषयी सर्वांनी कौतुक व्यक्त केले.



या बॅचमधील प्रत्येक विद्यार्थ्यांनी वैशिष्ट्यपूर्ण कामगिरी करत आपापल्या क्षेत्रामध्ये यशस्वी झाले आहेत. तोच वर्ग आणि पुन्हा त्याच आठवणीने हा वर्ग भरला . सरस्वती पूजनाने सुरू झालेला हा कार्यक्रम तब्बल पाच तास सुरू होता.

ओळख आणि प्रस्तावनेने सुरू झालेला हा कार्यक्रम अतिशय समर्पक भावनेने संपन्न झाला.

यावेळी उपस्थित गुरुवर्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमासाठी शेळगाव शिक्षण प्रसारक मंडळ अध्यक्ष बाबा गायकवाड, माजी पंचायत समिती सदस्य विलासदादा गाटे, मुख्याध्यापक धनाजी तिकटे, सुनील गोरे, बळीराम गुरव ,सुनील खटाळ, विश्वनाथ साबळे, चंद्रकांत ताकमोगे, बाळासाहेब साळुंखे, या शिक्षक मान्यवरासह माजी विद्यार्थी माजी सरपंच बाळराजे गाटे, देवा कुलकर्णी , तानाजी डिसले, सत्यजित देशमुख, सागर उबाळे, सूर्यभान निचळ, ज्ञानेश्वर कोरेकर यांच्यासह

विद्यार्थी व मित्र मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी वर्गातील विद्यार्थिनी रेश्मा चौधरी यांना सर्व विद्यार्थी व शिक्षक यांच्याकडून आर्थिक मदत करण्यात आली. याशिवाय प्रशालेला विद्यार्थ्यांकडून 6 सिलिंग फॅन भेट देण्यात आले.

व त्यांच्या मुलासाठी शालेय मदत करण्याचा निर्णय घेण्यात आला.

या सुंदर मेळाव्यासाठी नियोजनासाठी तानाजी डिसले, सूर्यभान निचळ यांनी प्रयत्न केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन देवा कुलकर्णी यांनी केले

तर आभार प्रदर्शन माजी सरपंच बाळराजे गाटे यांनी मानले. आगामी काळामध्येही हा स्नेहभाव जपत एकमेका सहकार्य करू अवघे धरू सुपंथ म्हणत हा कार्यक्रम संपन्न झाला.

## मलाबारच्या नवीन शोरूमचे उद्घाटन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

विश्वासार्ह आणि उत्तरदायी सराफ पेढी असलेल्या मलाबार गोल्ड अँड डायमंड्सने पुण्यातील एरंडवणे येथील कर्वे रोडस्थित त्यांच्या नवीनतम शोरूमच्या उद्घाटनाची आज अभिमानाने घोषणा केली. ३,७५० चौरस फूट क्षेत्रफळावर पसरलेले हे नवीन विक्री दालन ग्राहकांना विविध डिझाइन आणि शैलींमधील दागिन्यांच्या उत्कृष्ट संग्रहासह जागतिक दर्जाचा खरेदी अनुभव देण्यासाठी विकसित केले गेले आहे.




या नवीन दालनाचे उद्घाटन हे ब्रँडच्या अपवादात्मक कारागिरी आणि सेवा वैशिष्ट्यांसह पश्चिम भारतात आपला ठसा वाढवत नेण्याच्या वचनबद्धतेच्या दिशेने पडलेले आणखी एक पाऊल आहे. हे नवीन शोरूम पश्चिम भारतातील ब्रँडचे ४५ वे विक्री दालन आहे, ज्यामुळे या प्रदेशात मलाबारची उपस्थिती आणि नेतृत्व आणखी मजबूत बनले आहे.

नवीन शोरूमच्या उद्घाटन समारंभाला माननीय प्रमुख पाहुण्यांमध्ये, महाराष्ट्राचे उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री श्री चंद्रकांत पाटील आणि महाराष्ट्राच्या नगरविकास राज्यमंत्री श्रीमती माधुरीताई मिसाळ यांच्यासह इतर मान्यवरांमध्ये माननीय खासदार श्री श्रीरंगप्पा बारणे; मा. खासदार आणि शिवसेना नेते श्री गजानन कीर्तिकर, माननीय खासदार श्रीमती मेधाताई कुलकर्णी, माननीय मा खासदार श्री शिवाजीराव आढळराव पाटील, माननीय आमदार श्री हेमंत रासने, महाराष्ट्र विधानसभेचे माननीय माजी सदस्य श्री रवींद्र धंगेकर, नगरसेवक श्री श्रीनाथ भीमाले आणि नगरसेवक श्री पृथ्वीराज सुतार यांच्यासह मलाबारच्या व्यवस्थापन पथकातील सदस्य, मौल्यवान ग्राहक आणि हितचिंतक यांची उपस्थिती होती.

## गाव तेथे वार्ताहार : 'दै. आरंभ पर्व'साठी वार्ताहरांची नियुक्ती सुरू

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

ग्रामीण भागातील सर्वसामान्यांचे आवाज मुख्य प्रवाहातील माध्यमांपर्यंत पोहोचवण्यासाठी "दै. आरंभ पर्व"ने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. 'गाव तेथे वार्ताहार' या उपक्रमांतर्गत महाराष्ट्रातील विविध गावांमधून स्थानिक वार्ताहरांची नेमणूक करण्यात येणार आहे.

दैनिक आरंभपर्व आरंभ एका नव्या पर्वाचा

गावकडच्या बातम्या, स्थानिक प्रश्न, ग्रामीण विकास, शेती, शिक्षण, आरोग्य, महिला बचत गटांची कामगिरी, युवा पुढाकार अशा अनेक महत्त्वाच्या विषयांची प्रभावीपणे मांडणी करण्यासाठी हे वार्ताहर काम करणार आहेत. स्थानिक पत्रकारांना गावपातळीवरील घटना, घडामोडी, समस्या आणि सकारात्मक घडामोडींचे दस्तावेजीकरण करण्याची संधी मिळणार आहे.

या संधीसाठी इच्छुक पत्रकारांनी **निवासी संपादक लक्ष्मण साबळे** सरांशी थेट संपर्क साधावा. त्यांचा संपर्क क्रमांक आहे 8605284272. अनुभव असलेले तसेच पत्रकारितेची आवड असलेले नवीन उत्साही तरुण यामध्ये सहभाग घेऊ शकतात.

'दै. आरंभ पर्व' हे ग्रामीण पत्रकारितेला बळ देण्याचे व लोकशाहीचे खरे प्रतिबिंब घडवण्याचे कार्य करत आहे. त्यामुळे ग्रामीण पत्रकारांना एक व्यासपीठ मिळणार असून, स्थानिक पातळीवरील बातम्या राज्य आणि देशपातळीवर पोहोचवण्याची संधीही मिळणार आहे.

## कुठे शोधु पाण्यात रस्ता

### अनधिकृत प्लॉट घेताना घ्या काळजी

**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

मागील आठवड्यात झालेल्या पावसामुळे आळंदी म्हातोबाची येथील रस्ते पाण्याखाली गेल्याने रहिवाशांना आपल्या घराचा रस्ता देखील सापडत नसल्याने रहिवाशांनी जायचे तरी कोठून याची चिंता लागली आहे .

आळंदी म्हातोबा व कुंजीरवाडी या दोन्ही गावामधील शिवरस्त्यालगत असणाऱ्या मगर वस्ती मधील रहिवाशांच्या

काही घरांमध्ये पाणी साचलेले आहे तर काही घरे सध्या पाण्यामध्येच आहे.शिवरस्त्याच्या अपुऱ्या माहितीमुळे तसेच चुकीच्या पद्धतीने केलेल्या प्लॉटिंग मुळे व स्थानिक शेतकऱ्यांनी शेताचे बांद रुंदविल्यामुळे येथील पाणी बाहेर जाण्यास मार्ग नाही.स्थानिकांच्या म्हणण्याप्रमाणे नकाशानुसार या ठिकाणी पाणी जाण्यासाठी नैसर्गिक ओघळ होती ती आता नाही.त्यामुळे ड्रेनेजचे पाणी सोडायचे कुठे हा मुख्य प्रश्न आहे.जिथे सांडपाणीच जायला जागा नाही तिथे पावसाचे पाणी कुठे सोडणार.तसेच चुकीच्या पद्धतीने केलेल्या प्लॉटिंगमुळे अनेक प्लॉट सध्या पाण्याखाली आहेत. अनेक दिवस पाणी साठून राहिल्याने रहिवाशांसमोर आरोग्याचे प्रश्न निर्माण झालेले आहे.शिवरस्ता नेमकं कुठे आहे आणि किती आहे याची योग्य माहिती नसल्याने याठिकाणी नवीन रस्ता देखील प्रशासनाच्या माध्यमातून सध्यातरी करता येत नसल्याने स्थानिकांची मोठी गैरसोय होत आहे. पुण्यामध्ये नोकरी व्यवसायानिमित्ताने अनेक बाहेर गावाचे लोक येत आहेत अशावेळी पुण्यात स्वतःचे घर जागा असावी असा विचार करून पै पै साठवून लोक प्लॉटिंग मधे गुंठा घेतात परंतु जागा विकेपर्यंत जागेचे फसवे सुशोभीकरण करून जागा विकली



जाते.त्यामुळे जागा घेताना रस्ता ,ड्रेनेज ,लाईट ,पाण्याची सुविधा या गोष्टींची खात्री करूनच व्यवहार करावा.

याबाबत महसूल विभागाशी संपर्क केला असता मंडलाधिकारी थेऊर यांनी सांगितले की सदरील जागेचा पंचनामा केला असून याचा रिपोर्ट तहसीलदार यांना पाठवणार आहोत.यामध्ये नैसर्गिक ओघळ बुजविण्यात आलेले असून स्थानिक शेतकऱ्यांनी बांध रुंदविलेले आहेत.

सदरील रस्त्याचा व पाण्याचा प्रश्न अनेक दिवसांपासून रेंगाळत असून स्थानिक रहिवाशांच्यामध्ये एकीची भावना दिसत नसल्याने व या समस्येचा पाठपुरावा एकत्र येऊन करत नसल्याने सदरील प्रश्न चिघळत चाललेला आहे.स्थानिक नागरिक गिरीश शिवरकर सदरील परिस्थीबाबत वेळोवेळी आवाज उठवत असून स्थानिक नागरिकांनी देखील यात सहभागी होऊन पाठपुरावा करणे गरजेचे आहे.तसेच स्थानिक राजकीय लोकांनी देखील केवळ निवडणुकीपुरता व मतांपुरता विचार न करता एक जबाबदारी म्हणून हा प्रश्न मार्गी लावणे गरजेचे आहे.काल कल्पना देऊन देखील एकही स्थानिक ग्रामपंचायत सदस्य या ठिकाणी उपस्थित नव्हते यामुळे स्थानिक नागरिक म्हणाले यांना आम्ही मतदान करावे का नाही.

## पँटालून्सनच्या नवीन स्टोअरचे उद्घाटन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पॅण्टालून्स या आदित्य बिर्ला फॅशन अँड रिटेल लि.च्या भारतातील आघाडीच्या फॅशन रिटेलरने पुण्यातील एसजीएस मॉल येथे नवीन रूपांतरित केलेले स्टोअर लॉंच केले आहे. भारतातील प्रख्यात अभिनेत्री श्रीया पिळगावकर यांच्या हस्ते या सुधारित स्टोअरचे उद्घाटन करण्यात आले, जेथे भव्य सेलिब्रेशनमध्ये स्टार पॉवर दिसण्यात आली. 19350 चौरस फूट जागेवर पसरलेल्या या स्टोअरमध्ये समकालीन लेआऊटसह ऐसपैस जागा, लक्षवेधक डिस्प्ले आणि सुधारित डिझाइन आहे, ज्यामधून उत्साहवर्धक शॉपिंग अनुभव मिळतो.




देशभरातील निवडक स्टोअर्समध्ये राबवण्यात येणाऱ्या ब्रँडच्या मोठ्या सुधारणा उपक्रमाचा भाग म्हणून हे उत्साहवर्धक परिवर्तन करण्यात आलेले पुण्यातील पहिले पॅण्टालून स्टोअर आहे. नवीन रुप घेतलेले स्टोअर खरेदीदारांना फॅशनचा शोध घेण्यास आणि एकाच ठिकाणी सर्व उत्पादने मिळण्यास मदत करण्यासाठी डिझाइन करण्यात आले आहे, ज्यामध्ये आधुनिक ट्रेण्डिंग रनवेपासून ॲक्सेसरीज, कलर कॉस्मेटिक्स व फ्रॅग्रन्सेसचा समावेश आहे.

याप्रसंगी मत व्यक्त करत पॅण्टालून्स व स्टाइल अपच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संगीता तनवानी म्हणाल्या, आम्हाला पुण्यातील ग्राहकांसाठी सुधारित शॉपिंग अनुभव सादर करताना आनंद होत आहे. या भव्य पुर्नउद्घाटनामधून ग्राहकांना उत्साहित व स्टायलिश फॅशन देण्याप्रती आमची कटिबद्धता दिसून येते, जे प्रेरणादायी व सर्वसमावेशक आहे.

# धायरीत लोकशाही दिन उत्साहात साजरा

### नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ व विविध प्रमाणपत्रांचे वाटप




**धायरी- (दै. आरंभ पर्व)**

महाराष्ट्र शासना विभागाच्या छत्रपती शिवाजी महाराज स्व समाधान शिबिर अभियानांतर्गत धायरी येथील मुक्ताई गार्डन येथे लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले जनतेच्या समस्या आणि तक्रारीचे निवारण करून अनेक लाभार्थ्यांना लाभ ही या निमित्त देण्यात आला.

नागरिकांच्या सेवेसाठी ही अशी भरायचे आयोजन करण्यात आले होते.

खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार भीमराव तापकीर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये घेण्यात आलेल्या या कार्यक्रमांमध्ये उपविभागीय अधिकारी डॉक्टर यशवंत माने तहसीलदार किरण सुरवसे संजय गांधी योजनेचे तहसीलदार अमोल कदम

नगरसेवक श्री. राजाभाऊ लायगुडे,मा नगरसेवक बाळासाहेब नवले,नीताताई दांगट,मतदार संघ अध्यक्ष सचिन जी मोरे,पंचायत समिती सदस्य वस्ताद सुभाष पोकळे,हेमंतदादा दांगट,स्वी नगरसेवक गंगाधर भडावळे,माजी सरपंच गुलाबअण्णा पोकळे ,प्रगतशील शेतकरी बाळासाहेब दामोदर पोकळे,नामदेव आण्णा भूरूक, सरचिटणीस बाप्पुसाहेब पोकळे पाटील,युवा मोर्चा सारंग नवले,प्रभाग अध्यक्ष पै तुषार पोकळे,महिला आघाडी रोहिणी रहाणे,तेजस्विनी शिरोडकर,तुषार श्रीहरी पोकळे इ मान्यवर व नागरिक उपस्थित होते.

यावेळी नागरिकांच्या समस्या जाणून त्यांच्या समस्येचे निराकरण करण्यात आले यावेळी प्रारंभी प्रस्ताविक तहसीलदार किरण सुरवसे यांनी शासकीय विभागाच्या योजनांची माहिती नागरिकांना दिली.

यावेळी खडकवासल्याचे आमदार भीमराव तापकीर यांनी नागरिकांच्या समस्यांची जाण घेऊन संबंधित प्रशासनाला त्यासंबंधी कारवाई करण्याची आदेश दिले.

धायरी मध्ये नागरिकांच्या सेवेसाठी वन उद्यान उभारण्याची गरज यावेळी आ. तापकीर यांनी बोलून दाखवली.

या कार्यक्रमाचे नियोजन भाजपा मंडलाध्यक्ष यशवंत लायगुडे यांनी केले. सर्व दाखले एकाच ठिकाणी मिळाले यावेळी महसूल प्रशासनातील लागणारे विविध दाखले यावेळी एका जागेवर देण्यात आले.

यामुळे दिव्यांग व नागरिकांची चांगली सोय झाली त्यावेळी नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

दैनिक आरंभपर्व आरंभ एका नव्या पर्वाचा

सिंहगड रोड भागातील जनतेचा आवाज.. इथं आहे जनहिताचे सर्व दैनिक आरंभपर्व

गाव तेथे वार्ताहर

महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा,तालुका, शहर आणि ग्रामीण भागात

वार्ताहर/पत्रकार आणि जाहिरातदार नेमणे आहेत.

दैनिक आरंभपर्व आरंभ एका नव्या पर्वाचा

या लोकप्रिय दैनिक वृत्तपत्राकरिता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात प्रतिनिधी नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.

जॉईन झालेल्या प्रत्येक प्रतिनिधीना आय कार्ड आणि नियुक्ती पत्र दिले जाईल.

* पात्रता *

१.समाजसेवेची आवड
२.जनसंपर्क
३.स्मार्ट फोन असणे आवश्यक
४.सोशल मीडियाचा वापर करता येणे

दै.आरंभपर्व मीडिया समूह 7276314142 / 9284559577 / 8605284272







# राजगुरुनगर एसटी बसस्थानकावर 'एसटी वाचवा एसटी वाढवा' अभियान

**किरण खुडे**

**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

येथील राजगुरुनगर एसटी बसस्थानकावर 'एसटी वाचवा एसटी वाढवा' या अभियानांतर्गत लोकजागर संघटना, लोकशाही उत्सव समिती, डी. वाय.एफ. आय. संघटना आणि एसटी कामगार संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने प्रवासी व नागरिकांमध्ये जनजागृतीसाठी अनोखे अभियान राबविले.

यावेळी प्रवाशांशी संवाद साधत त्यांना एसटी महामंडळाच्या कामाविषयी तसेच एसटीच्या कर्मचाऱ्यांविषयी व एसटीच्या सेवेविषयीचे महत्व स्वयंसेवकांनी समजावून सांगितले. त्याचप्रमाणे एसटीच्या खाजगीकरणाच्या विरोधात आणि सरकारी धोरणांचा निषेध करण्यासाठी लोकांमध्ये जागृती केली.

यावेळी बोलताना लोकजागर संघटनेचे डॉ. सुरेश बेरी म्हणाले, एसटी ही सर्वसामान्यांची जीवनवाहिनी आहे एसटीच्या सेवेला ७७ वर्ष पूर्ण झाली आहे. अविरत सेवेची व रस्ता तिथे एसटी अशा पद्धतीने ही एसटी सर्वसामान्यांसाठी धावत असते. मात्र एसटीच्या स्थितीविषयी सरकारी धोरणे अतिशय वाईट आहेत. जाणीवपूर्वक महामंडळाला खाजगीकरणाकडे नेणारा छुप्या पद्धतीचा डाव सरकारी धोरणातून आखला जात आहे. एसटी तोट्यात आहे, असं दाखवून तिचं टप्प्याटप्प्याने खाजगीकरण करण्याच्या खटपटीत सरकार आहे. व कोणतही सरकार आलं, तरी त्यांना एसटी विषयी व पर्यायाने सर्वसामान्यांच्या जीवनवाहिनी विषयी फारशी आस्था नाही. यासाठी सर्वसामान्य नागरिकांना याविषयी जागृत करावं अशी आमची भूमिका आहे. आज एसटीला किमान पन्नास हजार सुसज्ज चांगल्या गाड्यांची आवश्यकता असल्याचेही ते म्हणाले.

पुढे बोलताना ते म्हणाले, कधी नागरीकांना वेळेवर सेवा देता येत नाही, तर कधी कामगारांचे पगार वेळेवर होत नाही. यासाठी वेगवेगळी कारणे देऊन शासन वेळकाढूपणा करत आहे. महामंडळाचा खर्च प्रवासी वाहतूकीच्या उत्पन्नातून निघत नसेल तर त्यासाठी अंदाजपत्रकातून तरतुद करा. कारण एसटी प्रवास हा नागरीकांचा मुलभूत अधिकार आहे. तसेच देश हितासाठी सार्वजनिक वाहतूकीचा वापर करणे हे नागरीकांचेही कर्तव्य आहे.

यावेळी कामगार संघटनेचे दत्ता गभाले यांनी कामगार संघटना ही कामगारांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसह प्रवाशांना दर्जेदार सेवा देण्यासाठी बांधील असल्याचे सांगितले.

यावेळी प्रवाशांना जनजागृती पत्रके वाटण्यात आली. 'एसटी वाचवा एसटी वाढवा' अशा घोषणा देण्यात आल्या.

या उपक्रमात राम नलावडे, गोकुळ बंगाळ, सुधीर मुरुडकर, निलेश सातकर, प्रविण जरांडे, अंबादास राख, सीमा काकडे, मिलींद चव्हाण, पंढरीनाथ शिवले, हिराबाई गायकवाड आदी सहभागी झाले होते.

## थोडक्यात




### सोमय्या विद्याविहार युनिव्हर्सिटीतर्फे २०२५-२६ साठी प्रवेश प्रक्रिया सुरू

**पुणे (आरंभ पर्व) : सोमय्या विद्याविहार युनिव्हर्सिटी (एसव्हीयू), मुंबई ही एक अत्यंत प्रगतीशील आणि बहूविध शिक्षण देणारी खासगी संस्था आहे. या संस्थेतर्फे २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील अंडरग्रॅज्युट पोग्राम्ससाठी आता प्रवेश अर्ज स्वीकारण्यात येत आहेत. विविध क्षेत्रांसाठीच्या आघडीच्या १०० हून अधिक प्रोग्राम्स आणि सहजसोप्या प्रवेशफेऱ्यांसह एसव्हीयू विद्यार्थ्यांना शैक्षणिक उत्कृष्टता आणि उद्योगक्षेत्रांशी संबंधित जागतिक अनुभव यासह करिअरमध्ये सकारात्मक बदल घडवणारी शैक्षणिक प्रक्रिया देऊ करते. संस्थेतील अर्ली ॲडमिशन ॲप्लिकेशनसाठीची अंतिम तारीख ३१ मे २०२५ आहे. मुंबईसारख्या उत्साही शहरात मोक्याच्या ठिकाणी वसलेले, ८० वर्षांचा शैक्षणिक उत्कृष्टतेचा वारसा सांगणारे एसव्हीयू उच्च शिक्षणातील नाविन्यपूर्णतेसाठी कायमच अग्रणी राहिले आहे. सखोल शिक्षण, उत्कृष्ट सोयीसुविधा, आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि उत्साही दमदार कॅम्पस जीवन यातून हे विद्यापीठ भविष्यासाठी सज्ज असे ग्रॅज्युएट घडवण्यासाठी ओळखली जाते. "प्रत्येक विद्यार्थ्याला सखोल विचार करणे, ठळकपणे नाविन्यता मांडणे आणि तत्व जपत नेतृत्व करण्यासाठी शिक्षणाने सज्ज करावे यावर सोमय्या विद्याविहार युनिव्हर्सिटीमध्ये आमचा कायमच विश्वास आहे. आमच्या एकात्मिक, समग्र दृष्टिकोनामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच भविष्याला नवा आकार देण्याची दृष्टी आणि कौशल्ये विकसित करता येतील, याची खातरजमा होते.**

## प्लॅटिनम लव्ह बँड्ने 'द वेडिंग एडिशन' बँड्सच्या संग्रहाची केली घोषणा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

प्लॅटिनम लव्ह बँड्ने 'द वेडिंग एडिशन' या खास जोडप्यांसाठीच्या बँड्सच्या संग्रहाची घोषणा केली आहे. ९५ टक्के शुद्ध प्लॅटिनमपासून तयार करण्यात आलेले हे बँड्स, प्रेम आणि बांधिलकीचं प्रतीक ठरतात. या नव्या शृंखलेत प्रेमाच्या विविध पैलूंना अधोरेखित करणाऱ्या खास डिझाइन्सचा समावेश आहे. हे बँड्स केवळ सौंदर्यपूर्ण नसून, दोन व्यक्तींच्या भावनिक नात्याची खोली दाखवतात, असा दावा कंपनीने केला आहे. ९५ टक्के शुद्ध प्लॅटिनममध्ये तयार केलेले प्लॅटिनम लव्ह बँड्स 'द लाखात एक' प्रेमाच्या भावनेचे



दुर्मिळ आणि कालातीत प्रतिध्वनी आहेत. ताऱ्याखाली किंवा लग्नाच्या गोंधळात शांत क्षणी देवाणघेवाण असो, हे बँड अशा जोडप्यांसाठी बनवले जातात जे नात्याचा सखोल अर्थ शोधतात - परस्पर आदर, वैयक्तिकता आणि खरोखरच दुर्मिळ असलेल्या प्रेमावर बांधलेल्या भागीदारीचे प्रतीक.

## 'कोटक ८११' द्वारे भारतातील पहिल्या डिजिटल बँकिंगचा उदय

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

कोटक महिंद्रा बँकेने (केएमबीएल/कोटक) आज त्यांच्या प्रमुख डिजिटल बँकिंग व्यासपीठ असलेल्या 'कोटक८११'च्या रुपाने एक धाडसी नवीन अध्याय सादर केला आहे. ज्यामध्ये आतापर्यंत देण्यात येत असलेल्या अखंड, अंतर्प्रेरणादायी आणि पूर्ण-सेवा अनुभवाचा उत्सव साजर करता येणार आहे. भारताच्या पहिल्या डिजिटल पिढीसाठी डिझाइन केलेले, नवीन 'कोटक८११' हे फक्त एक ॲप नाही, तर ते तुमच्या खिशातील एक परिपूर्ण बँक ठरणार आहे. स्मार्टफोनचा व्यापक वापर, परवडणारी इंटरनेट सुविधा आणि डिजिटल परिसंस्थेवरील वाढता विश्वास यामुळे भारतील ग्राहकांच्या वर्तनात सध्या उल्लेखनीय बदल घडत आहे. एक अब्जाहून अधिक मोबाईल वापरकर्ते आणि तरुण, तंत्रज्ञान-जाणकार लोकसंख्या यामुळे, डिजिटल बँकिंग क्रांतीसाठी आताचे युग सज्ज झाले आहे. आजचे ग्राहक पारंपरिक बँकिंगपेक्षाही आधुनिक सेवेची अधिक मागणी करतात. त्यांना वेग, साधेपणा आणि सुरक्षितता हवी आहे आणि हे सर्व त्यांना प्रथम मोबाईलमध्येच अनुभवता येते. कारण त्यात या सर्व सुविधा अखंडपणे एकत्रित केल्या



जात आहेत. मोहिमेच्या अनावरणाप्रसंगी बोलताना सीएमओ आणि प्रपोजिशनचे प्रमुख रोहित भसीन म्हणाले, की या उत्क्रांतीच्या केंद्रस्थानी बॉलीवूड अभिनेता रणवीर सिंग यांनी सादर केलेली एक उत्साही जाहिरात मोहीम आहे, जी आधुनिक बँकिंगचे अखंड, जलद आणि सहज असे सर्व सार टिपते. 'बँकिंग इतके सुरळीत, ते तर मख्खन आहे', हा मोहिमेचा मुख्य संदेश आहे. ॲपचा वापरकर्त्यांना येणारा अखंडित अनुभव आणि फक्त काही टप्प्यांमध्ये प्रत्येक आर्थिक गरजा पूर्ण करण्याची क्षमता याद्वारे प्रतिबिंबित केल्या जात आहेत. 'कोटक८११'चे उद्योग विभाग प्रमुख (बिझनेस हेड) मनीष अग्रवाल म्हणाले, की 'भारत डिजिटल बँकिंगमधील प्रगतीच्या उंबरठ्यावर उभा आहे आणि 'कोटक८११' हे याच पार्श्वभूमीवर तयार करण्यात आले आहे. पाच मिनिटांपेक्षा कमी वेळेत त्वरित कर्ज प्रक्रियेपासून ते अखंड 'यूपीआय' रक्कम, स्मार्ट गुंतवणूक साधने आणि कोटक महिंद्रा बँकेच्या विश्वासार्हतेद्वारे समर्थित कॅशबॅकपर्यंतच्या आमच्या सुविधा खरोखरच 'डिजिटल-फर्स्ट' अनुभव देतात.हे फक्त वापरण्यातील सुलभतेबद्दल नाही; तर ते विश्वास, सुरक्षितता आणि वापरकर्त्यांच्या बँकिंग प्रवासाबद्दल आहे.

## अहिल्याबाई होळकर यांच्या नावाने 'सूर्यदत्त'मध्ये अध्यासन सुरु करणार

### प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांची माहिती; 'सूर्यदत्त'च्या वतीने पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची ३००वी जयंती साजरी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर या एक महान प्रशासक, आदर्श व नीतिमान राज्यकर्त्या होत्या. त्यांचे जीवन म्हणजे त्याग, सेवा आणि जनहिताचा आदर्श आहे. 'शासन म्हणजे जनतेची सेवा' या तत्वावर आधारित त्यांचे कार्य लोककल्याणकारी असेच होते," असे मत सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक व अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांनी व्यक्त केले. देश व समाजाच्या हिताचे कार्य अविरतपणे करण्याचा कानमंत्र त्यांच्या व्यक्तित्व



व कार्यातून आपल्याला मिळतो, लवकरच अहिल्याबाई होळकर यांच्या नावाने सूर्यदत्त संस्थेत अध्यासन स्थापन करण्यात येणार आहे, असेही त्यांनी नमूद केले.

सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटसच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची ३००वी जयंती श्रद्धापूर्वक व उत्साहात साजरी करण्यात आली. 'सूर्यदत्त'च्या बावधन कॅम्पसमध्ये आयोजित कार्यक्रमात सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनच्या उपाध्यक्ष सुषमा चोरडिया, सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटसचे मुख्य कार्यपालन अधिकारी अक्षित कुशल, अधिष्ठाता प्रा. डॉ. प्रतीक्षा वाबळे, संचालक प्रशांत पितालिया यांच्यासह सर्व विभागाचे संचालक, प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया व सुषमा चोरडिया यांच्या हस्ते अहिल्याबाईंच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला.

प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया म्हणाले, "अहिल्याबाई होळकर यांच्या कार्यकाळात गरीब, वंचित आणि महिलांसाठी अनेक लोककल्याणकारी योजना राबवण्यात आल्या. त्यांनी शेतकरी, कारागीर व छोट्या उद्योजकांसाठी रोजगारवृद्धी, वनोपजांवर आधारित कुटीर उद्योग, हस्तकला आणि जलव्यवस्थापन योजना राबवल्या. लहान कालव्यांचे जाळे उभारून शेतीस चालना दिली आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ दिले. हिंदू देवदेवतांची मंदिरे, श्रद्धास्थाने सुरक्षित केली. अनेक शक्तिस्थळांचा जीर्णोद्धार केला. अहिल्याबाई होळकर यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन सूर्यदत्त परिवाराने परिसरातील गावांशी सातत्याने विविध उपक्रमांची जोड दिली आहे. त्यांच्या नीतीमुल्यांना सामोरे ठेवून संस्था कार्यरत आहे."

# दिल्लीपर्यंत यायला पैसे नाहीत : 'पद्मश्री' पोस्टाने पाठवा साहेब..!!

**(दै. आरंभ पर्व)**

ज्यांच्या नावापुढं कधीच कुणी "श्री" लावलं नव्हतं, ज्याच्याकडे संपत्ती म्हणून काय होते तर कपड्याचे फक्त तीन जोड, तुटलेली एक रबरी चप्पल, एक जुनाट चष्मा आणि रोख 732 रुपये फक्त !


त्याला जेव्हा चक्क पद्मश्री पुरस्कार जाहीर झाला तेव्हा त्यांनी सरकारला कळवलं की,

दिल्ली पर्यंत यायला पैसे नाहीत

"पद्मश्री".... पोस्टाने पाठवा साहेब !

अजब आणि अफाट आहे न हे ? मी सत्यकथा सांगतोय ओडिशातील हलधर नाग या अवलियाची.

कोसली भाषेत कविता लिहिणारे प्रसिद्ध कवी,



**लक्ष्मण साबळे - प्रतिक गंगणे**

कहर म्हणजे त्यांनी आजवर जितक्या कविता आणि वीस महाकाव्य लिहिली आहेत ते सर्व त्यांना तोंडपाठ आहे.

आणि आता तर संभलपूर विश्वविद्यालयात त्यांच्या "हलधर ग्रंथावली - भाग -2" याचा पाठयक्रमात समावेश करण्यात आलाय.

साधाच वेष, शक्यतो पांढर धोतर, गळ्यात गमछा आणि बहुतेक वेळा अनवाणी फिरणारे हलधर एक अफलातून अवलिया आहेत .

हि खरे तर इंडियन आयडॉल आहेत. पण कचकड्याच्या दुनियेतील रियालिटी शो मधल्याना आपले चॅनेलवाले हिरो करतात. आयडॉल ठरवतात. खरे आयडॉल तर हलधर जी सारखे आहेत. चॅनेलवाल्याचे यांच्याकडे लक्ष कधी गेले तर याना पद्मश्री जाहीर झाल्यावर !

श्री हलधर जी याची जीवनकहाणी तुम्हालाही प्रेरणा देऊन जाईल. म्हणून तर हि पोस्ट करतोय.

ते एका अत्यंत गरीब हरिजन कुटुंबातून आलेले, आईवडिलांचे निधन झाल्याने वयाच्या दहाव्याच वर्षी हलधर जी अनाथ झाले. त्यामुळे त्यांना इयत्ता तिसरीतच शाळा सोडवि लागली. पोटासाठी इतक्या लहान वयात ते ढाब्यावर खरकटी भांडी विसळण्याचे काम करू लागले. त्यानंतर एका गृहस्थाला त्याची दया आली व यांना एका शाळेच्या स्वयंपाक घरात काम मिळाले. तिथं थोडं स्थिरस्थावर आयुष्य त्यांना मिळालं.

नंतर बँकेकडून त्यांनी शंभर रुपये कर्ज घेऊन पेन - पेन्सिल - शालेय वस्तूच्या विक्रीचे छोटेसे दुकान टाकले. आणि उदरनिर्वाह त्यातूनच भागवू लागले.

आता त्यांच्यातील साहित्यिक कौशल्याबद्दल सांगतो. श्री हलधर जी यांनी 1995 च्या सुमारास स्थानिक उडिया भाषेत "राम शबरी" सारखे काही धार्मिक प्रसंग निवडून त्यावर स्फुट लिहून ते लोकांना ऐकवू लागले. भावनेने ओथंबलेले त्यांचे ते शब्द ऐकताना लोक गुंग होऊन जायचे. पाहता पाहता त्यांच्या रचना प्रचंड लोकप्रिय झाल्या. हळूहळू ती कीर्ती सर्वदूर पसरू लागली. अनेक नामांकित लेखक कवींनी त्यांची दखल घेऊन विविध वृत्तपत्रातून त्यांच्याबद्दल भरभरून लिहिले. आणि अखेर दिल्लीपर्यंत त्यांची हि कीर्ती पोचली आणि त्यांना चक्क साहित्य क्षेत्रातील योगदानाबद्दल "पद्मश्री" पुरस्कार जाहीर झाला.

अजून एक कहर म्हणजे स्वतः हलधर जी फक्त तिसरी पर्यत शिकलेलं पण आजमितीस पाच पोस्ट ग्रॅज्युएट विद्यार्थी त्यांच्या साहित्यावर पीएचडी करत आहेत.

त्यांच्याबद्दल इतकंच म्हणावसं वाटत की,

आप किताबो में प्रकृति को चुनते है पद्मश्री ने, प्रकृति से किताबे चुनी है।।

डीडी क्लास : भोवती अनुकूल काहीच नसतानाही यश खेचून आणणारे, दगडालाही फोडून त्यातून बाहेर उगवून येणारे हलधर जी सारख्या लोकांची चरित्रे का वाचायची ? तर आपल्यात, आपल्या पुढच्या पिढीत त्यातूनच ऊर्जा यावी. "सगळी परिस्थिती वाईट आहे. नाहीतर मी नक्कीच काहीतरी करून दाखवलं असत" अशी कारणे देऊन निराश झालेल्यासाठीच हि आजची हलधर जी याची कहाणी तुम्हांपुढे ठेवली. शेवटी मी नेहमी सांगतो तेच आज पुन्हा सांगतो,

काहीही होवो..... रडायच नाही

तर लढायच आणि

लढून जिंकायच..

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.